# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९८–२०१०/ दिनांक :

श्री. सुभाष अण्णाप्पा कुंभार,
रा. उमराणी रोड, जत, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सुभाष अण्णाप्पा कुंभार, रा. उमराणी रोड, जत, ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे घरगुती करणासाठी नवीन वीज पुरवठा मिळणेसाठी दि. १४.८.२००९ रोजी अर्ज दाखल केला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार त्यांना दि. १३.९.२००९ पर्यंत चलन देणे आवश्यक होते, परंतु तसे झाले नाही.

त्यामुळे कृती मानकाचा भंग झाला आहे. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे ‘ क्ष ‘ फॉर्ममध्ये तक्रार दिली आहे. अंतर्गत कक्षाने चलन व कनेक्शन देणेबाबत दि. २५.११.२०१० रोजी आदेश दिले आहेत. कनेक्शन न मिळालेमळे प्रस्तुत तक्रार मंचाकडे दि. २३.४.२०१० ला दाखल करुन कृती मानकातील तरतुदीनुसार कनेक्शन मिळावे व उशीरापोटी भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने दिनांक ४.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांचा मागणी अर्ज दिनांक १४.८.२००९ ला प्राप्त झाल्याचे मान्य केले व त्यांस दि.८.१.२०१० रोजी चलन देण्यात आले.

प्रस्तुत तक्रार मंचाकडे सुनावणीसाठी दि. ९.६.२०१० ला ठेवली असता तक्रारदार हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. राठोड, प्रभारी सहाय्यक अभियंता, जत उप विभाग, श्री. ए.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महंकाळ विभाग हजर होते. त्यांनी विलंब मान्य केला आहे. तक्रारदाराने संच मांडणीचा चाचणी अहवाल दिलेला आहे. परंतु दि. २१.१.२०१० रोजीच्या संयुक्त तपासणी अहवालामध्ये संचाची मांडणी आढळून आलेली नाही. अहवालावर तक्रारदार, कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता यांच्या सह्या आहेत.

दरम्यान वि.प.ने काम चालू केल्यामुळे तक्रारदाराने तक्रार मागे घेत असल्याचे व नुकसान भरपाई नको असल्याचे पत्र दि. ९.६.२०१० रोजी सुनावणीच्यावेळी वि.प.ने मंचासमोर हजर केले. त्यामुळे प्रस्तुत तक्रार निकाली काढणे योग्य होईल.

## आदेश

१) तक्रारदाराने तक्रार मागे घेतल्याने निकाली काढण्यात येत आहे.

२) भरपाईबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री., बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :